आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
सोमवार दिनांक २० ऑक्टोबर २०२५

ठळक बातम्या

1. ऑपरेशन सिंदूरसाठी देशाच्या तिन्ही सैन्यदलांचं पंतप्रधानांकडून कौतुक / आयएनएस विक्रांतवर नौ-सैनिकांबरोबर साजरी केली दिवाळी.

2. विकसित महाराष्ट्राचे ध्येय गाठण्यासाठीच्या 'विकसित महाराष्ट्र २०४७' या मसुद्याला सल्लागार समितीची मान्यता.

3. विविध आरोग्य योजनांच्या एकत्रीकरणासाठी राज्यात 'वॉर रूम'ची स्थापना, नागरिकांसाठी टोल-फ्री क्रमांक जारी.

4. राज्याचे माजी अर्थमंत्री महादेव शिवणकर यांचं आज गोंदिया जिल्ह्यातील आमगाव इथं वार्धक्यानं निधन.

पंतप्रधान नरेंद्र मोदी

देशाच्या तिन्ही सैन्य दलांमधल्या, अतुलनीय, समन्वयामुळे, ऑपरेशन सिंदूर दरम्यान, पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली असं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. गोवा आणि कारवारच्या किनाऱ्यावर, आय.एन.एस.विक्रांत या युद्ध नौकेवर नौदलाच्या जवानांसोबत पंतप्रधानांनी दिवाळी साजरी केली त्यावेळी ते बोलत होते. mआय.एन.एस.विक्रांत ही युद्धनौका म्हणजे, आत्मनिर्भर भारत आणि मेड इन इंडिया उपक्रमाचं प्रतीक आहे असं मोदी म्हणाले. गेल्या दशक भरात संरक्षण उत्पादनात, तीनपट वाढ झाली आहे. तिन्ही सेना दलांसाठी शस्त्र आणि उपकरणांचं उत्पादन देशातच करण्यावर भर दिला जात असून, भारत शस्त्रास्त्र निर्यातीत, जगातला आघाडीचा देश बनेल असा विश्वास, पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केला.

*औसतन हर 40 दिन में एक नया स्वदेशी युद्धपोत या पनडुब्बी नेवी में शामिल की जा रही है। हमारी ब्रह्मोस और आकाश जैसी मिसाइलों ने ऑपरेशन सिंदूर में भी अपनी क्षमता साबित की है।अब दुनिया के कई देश इन मिसाइलों को खरीदना चाहते हैं। भारत तीनों ही सेनाओं के लिए हथियार और उपकरण एक्सपोर्ट करने की क्षमता बिल्ड कर रहा है।*

जवानां सोबत दिवाळी साजरी करणं आपल्यासाठी आनंदाची बाब असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं.

<u>नरकचतुर्दशी</u>

दीपावलीच्या पर्वात आज, नरकचतुर्दशी साजरी होत आहे. आज पहाटे घरोघरी, अभ्यंगस्नानानं या दिवसाची सुरुवात झाली. नागपुरात विविध मंदिरात, पहाटे नरक चतुर्दशी निमीत्त पूजा विधीसह मंगलस्नान आणि अन्य षोडशोपचार संपन्न झाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, राज्यपाल, आचार्य देवव्रत यांनी, दीपावली निमित्त नागरिकांना, शुभेच्छा दिल्या आहेत. ऐकुया यावर आधारित एक विशेष रिपोर्ट -

*दीपावलीचा हा सण अंध:कारावर प्रकाश, अज्ञानावर ज्ञान तसंच वाईटावर चांगुलपणाच्या विजयाचं प्रतीक असून, अधर्मावर धर्माच्या विजयाचं प्रतिक आहे. देशाच्या विविध भागांमध्ये उत्साहानं साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देतो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी राज्यातल्या जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.*

*दिवाळीच्या या पावन पर्वावर अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यामध्ये लक्ष्मीपूजनाच्या पार्श्वभूमीवर, शेअर बाजारात उद्या विशेष दिवाळी मुहूर्त ट्रेडिंग सत्र आयोजित करण्यात आलं आहे. यासंदर्भात जारी केलेल्या परिपत्रकानुसार, शेअर बाजार उद्या दुपारी पावणे दोन वाजता सुरू होईल आणि दुपारी पावणे तीन वाजता बंद होईल. यावर्षीपासून मुहूर्ताच्या ट्रेडिंगची वेळ दिवसा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सणासुदीच्या या काळात नागरिक आपल्या मित्रपरिवार आणि निकटवर्तीयांना त्यांच्या सुरक्षित आणि सुगम प्रवासासाठी फास्ट टॅगचा वार्षिक परवाना उपहार स्वरुपात देऊ शकणार आहेत. हा वार्षिक परवाना भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणचा मोबाईल **ॲ**प-राजमार्ग यात्राच्या माध्यमातून खरेदी करता येणार आहे. हे **ॲ**प गुगल प्ले स्टोअर वर उपलब्ध आहे. खाजगी वाहनांसाठी एक वर्षासाठी या परवान्याचं शुल्क तीन हजार रुपये इतकं असून, हा परवाना देशभरातल्या एक हजारांहून अधीक टोलनाक्यांवर मान्य असणार आहे. (आकाशवाणी वृत्तविभागातून मी हेमांगी कुळकर्णी)*

<u>स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी</u>

नागपूर मनपाच्या 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' अभियानांतर्गत मनपा शाळांमध्ये विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं. विद्यार्थ्यांनी स्वतः रंगीत आकाशकंदील, तोरणे, ग्रिटिंग कार्ड आणि मातीचे दिवे तयार करून, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी केली.

## पर्यावरण पूरक दिवाळी

भंडारा जिल्ह्यातील, लाखनी शहरामध्ये, ग्रीन फ्रेंड्स नेचर क्लबच्या माध्यमातून, पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी, बसस्थानक परिसरात निसर्ग वाचविण्याचा संदेश देत, रांगोळी काढली. काही विद्यार्थ्यांनी, प्लास्टिक मुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी, विघटन होणाऱ्या वस्तूपासून आकाश कंदील तयार केलं. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः पर्यावरणाचं रक्षण करण्याचा संकल्प घेतला आणि नागरिकांमध्ये जनजागृती केली.

## 'व्हिजन डॉक्युमेंट'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, २०४७ अर्थात, स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात, संपूर्णपणे विकसित भारताचं स्वप्न पाहिलं आहे. या स्वप्न पूर्तीसाठी महाराष्ट्र कुठेही मागे पडणार नसून, महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' त्यासाठी निश्चितच सहाय्यकारी ठरेल असा विश्वास, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मुंबईत आयोजित 'विकसित महाराष्ट्र-२०४७' सल्लागार समितीच्या बैठकीत व्यक्त केला. या बैठकीत 'विकसित महाराष्ट्र-२०४७' मसुद्याला, सल्लागार समितीनं मान्यता दिली. हा मसुदा, मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी, लवकरच मंत्रि मंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. या मसुद्यात, २०२९, २०३५ आणि २०४७ अशा तीन टप्प्यातील, विकसित महाराष्ट्राचे ध्येय गाठण्याचा' रोडमॅप दिला आहे. विकसित महाराष्ट्राचा मसुदा हा ऐतिहासिक दस्ताऐवज असून, भविष्यात कुठलीही योजना, धोरणे बनविताना, या मसुद्याचा उपयोग झाला पाहिजे. हे 'डॉक्युमेंट' महाराष्ट्राला राज्यांसोबत नाही तर, जगासोबत स्पर्धा करण्यास सक्षम बनवेल असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. हा मसुदा बनविण्यासाठी नागरिकांनी दिलेल्या सूचनांबद्दल मुख्यमंत्र्यांनी आभार व्यक्त केलं.

## 'वॉर रूम'

राज्यातील विविध आरोग्य योजनांमध्ये समन्वय साधून दुहेरी लाभ टाळण्यासाठी आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी 'वॉर रूम' स्थापन करण्यात येत आहे. ही वॉर रूम, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या, देखरेखीखाली कार्य करणार असून, मित्रा अर्थात, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली हा कक्ष कार्यान्वित होईल. नागरिकांना सर्व योजनां विषयी माहिती आणि मदत मिळावी यासाठी,

एकच टोल-फ्री क्रमांक, 1800 123 2211 सुरू करण्यात आला आहे. या क्रमांकावरून अर्ज, शंका आणि तक्रारींचे निवारण, वॉर रूमच्या माध्यमातून केलं जाणार आहे.

<u>जीएसटी बचत</u>

२२ सप्टेंबर पासून सुरू झालेल्या, जी.एस.टी.बचत उत्सवाचा फायदा, समाजाच्या सर्व घटकांना होत आहे. आज जाणून घेऊया, जी.एस.टी. सुधारणांमुळे घर खरेदी क्षेत्रात झालेल्या बदलांबद्दल...

*जीएसटी प्रणालीतल्या सुधारणांमुळे घर बांधणीसाठीची सामग्री आणि पर्यायाने एकंदर खर्च कमी होऊन या क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे. सिमेंटवरचा कर २८ टक्क्यावरून १८ टक्क्यावर आल्यामुळे घरं आणि पायाभूत सुविधा उभारण्याचा खर्च कमी झाला आहे. संगमरवर आणि ग्रॅनाइटच्या ब्लॉक्सवरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्क्यावर आला आहे. तसंच विटांवरील जीएसटी देखील आता ५ टक्के झाल्याने छोटी बांधकामं स्वस्त झाली आहेत. या बदलांमुळे घरं खरेदी आणि पायाभूत सुविधांचा विकास अधिक परवडणारा होणार आहे. (आकाशवाणी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)*

<u>राज्य आपत्ती प्रतिसाद निधी</u>

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत, चालू आर्थिक वर्षात, केंद्र सरकारच्या वाट्याचा, दुसरा हप्ता महाराष्ट्राला मंजूर झाला आहे. यामुळे यंदाच्या मान्सून काळात, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं बाधित झालेल्यांना तात्काळ मदत देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी, एक हजार ५६६ कोटी ४० लाख रुपये निधी महाराष्ट्राला मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल, समाज माध्यमावरून ही माहिती दिली. या मदतीसाठी त्यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले. ही अग्रिम मदत असून, अंतिम मदत प्राप्त करण्या संदर्भातली प्रक्रिया सुरू असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<u>महादेव शिवणकर निधन</u>

राज्याचे माजी अर्थमंत्री महादेव शिवणकर यांचं आज गोंदिया जिल्ह्यात आमगाव इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या सरकारमध्ये त्यांनी अर्थ खात्याची जबाबदारी सांभाळली होती. आमगाव विधानसभा

मतदारसंघातून ते पाच वेळा निवडून आले होते तसंच, चिमूर मतदारसंघातून एकदा, लोकसभेवरही निवडून गेले होते. गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीत त्यांचं महत्त्वाचं योगदान होतं. शिवणकर यांच्या निधना बद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि इतर मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

महावितरण

आनंदाचं आणि उत्साहाचं पर्व असलेल्या दिवाळीत विद्युत सजावट, रोषणाई तसंच फटाक्यांची आतषबाजी करताना, विद्युत सुरक्षेला प्राधान्य देणं आवश्यक असून, सार्वजनिक विद्युत यंत्रणे सोबतच, घरगुती रोषणाईच्या विद्युत उपकरणांपासून सावध राहावं आणि विद्युत सुरक्षिततेची योग्य ती काळजी घ्यावी असं आवाहन, महावितरणच्या वतीनं करण्यात आलं आहे. घरगुती उपकरणांसह विद्युत माळेपासून सुरक्षित अंतरावर दिवे लावावेत. विद्युत वाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर आदी यंत्रणेपासून फटाके फोडताना सुरक्षित अंतर ठेवावं आणि फटाक्यांच्या आतषबाजीत, सार्वजनिक विद्युत यंत्रणेला आगीचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी असं, महावितरणनं म्हटलं आहे. विद्युत यंत्रणेला आग लागल्यास धोका निर्माण झाल्यास वीजपुरवठा खंडित झाल्यास महावितरण कार्यालयाच्या, १९१२ या टोल फ्री क्रमांकाशी, तातडीनं संपर्क साधावा असं आवाहन, महावितरणनं केलं आहे.

हवामान

पूर्व विदर्भातल्या गोंदिया आणि गडचिरोली तसेच पश्चिम विदर्भातल्या अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यात उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. परवा अमरावती, अकोला, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आगामी 23 आणि 24 तारखेला देखील काही जिल्ह्यांमध्ये वादळी हवामान राहू शकतं.

*****